तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी




# मराठा आरक्षण

# अजून 5 कोटी मराठे मुंबईत धडकणार



## मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणावरून आक्रमक; डायरेक्ट सरकारला चॅलेंज

मराठा आरक्षणावरून जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा राज्य सरकारला इशारा दिलाय. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी जरांगे पाटलांनी कडक उपोषण सुरू केलं असून पाणीबंद करण्याचा निर्णय घेतलाय. सरकारच्या हातून अजूनही वेळ गेलेली नाहीये. सरकारनं तात्काळ मागण्या पूर्ण कराव्यात अन्यथा अजून 5 कोटी मराठे मुंबईत धडकणार असल्याचा इशारा जरांगेंनी दिला. तर सरसकट आरक्षणावर कोर्टाच्या निर्णयांचा पेच आहे, त्यामुळे सरकारची हैदराबाद आणि सातारा गॅझेटवर चर्चा सुरू असल्याचं राधाकृष्ण विखे-पाटलांनी म्हटल आहे. मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधलाय. नेहमीप्रमाणे मराठा आरक्षणावरून जरांगेंनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. तर, सामाजिक काम करताना तुम्हाला शिव्या आणि टीका सहन करावी लागते असं प्रत्युत्तर टीकाकारांवर फडणवीसांनी दिले. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटलांची आहे. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत मुंबई सोडणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. तर जरांगेंच्या ओबीसीतून आरक्षणाच्या मागणीनंतर ओबीसी नेत्यांनी देखील बैठकींचा सपाटा लावत जरांगेंच्या मागणींचा विरोध केला.शाहू महाराज छत्रपती यांनी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पाठिंबा दिलाय.. राज्य सरकारनं जरांगेंना दिलेलं आश्वास पाळावं असं भाष्य शाहू महाराजांनी आंदोलनावर केलंय.. तर कोणताही उशिर न करता सरकारनं आंदोलनावर मार्ग काढावा अशी मागणी शशिकांत शिंदेंनी केली. मराठा आरक्षणाच्या गुलाल उधळूनच जाणार असल्याचा निर्धार जरांगेंनी केला आहे. जरांगेंनी सुरू केलेल्या आंदोलनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात दोन गट पडले आहेत. विरोधकांनी आरक्षणावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. तर ओबीसींबाबत विरोधकांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याचं आव्हान सत्ताधा-यांनी केलंय. त्यामुळे मराठा आरक्षणावरून राज्याचं राजकारण चांगलंच तापलंय. मात्र, जरांगेंनी केलेल्या मागण्या सरकार पूर्ण करणार की नाही? राज्य सरकार जरांगेंच्या मागण्यांवर मधला मार्ग काढणार का? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.



: जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. आझाद मैदानावर जरांगे पाटलांनी आजपासून पाणीबंद उपोषण सुरू केलं आहे. मराठा आरक्षणासाठी एकीकडे जरांगे जीवाची बाजी लावतायत. मात्र, दुसरीकडे मराठा आंदोलकांनी जरांगेंच्या आवाहनाकडे पाठ फिरवली का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येतोय. याचं कारण जरांगे पाटलांनी सांगितलेल्यानंतरही मराठा आंदोलक हे अनेक ठिकाणी हुल्लडबाजी करताना दिसतायत. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आझाद मैदानात ठाण मांडून बसलेत. आरक्षणासाठी राज्यभरातून हजारोंच्या संख्येनं मराठा समाज मुंबईत एकवटला आहे. एकीकडे जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आपली लढाई तीव्र केलीय. तर दुसरीकडे मात्र,

## मनोज जरांगेंची जीवाची बाजी, तर आंदोलकांची मुंबईत हुल्लडबाजी

काही मराठा आंदोलक हे जीवाची मुंबई करतांना दिसतायत. मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी जरांगे पाटलांनी निर्जळी उपोषण सुरू करून जीवाची बाजी लावलीय. मात्र, दुसरीकडे मराठा आंदोलक हे हुल्लडबाजी करताना दिसतायत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर मराठा आंदोलक रेल्वे ट्रॅकवर उतल्याचं पाहायला मिळाले होते. यावेळी आंदोलकांनी सीएसएमटी स्थानकावर मोठी गर्दी केली होती. यावेळी मराठा आंदोलकांकडून घोषणाबाजी देखील करण्यात आली. मराठा आंदोलकांच्या या गर्दीमुळे आणि रेल्वे स्टेशनवर केलेल्या गर्दीमुळे लोकल ट्रेनला विलंब झाल्याचं पाहायला मिळालं आणि त्यामुळे प्रवाशांना देखील मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता. काही आंदोलक हे मोटरमनच्या कॅबिनमध्ये देखील घुसल्याचं पाहायला मिळाले. लोको पायलटनं केलेल्या बऱ्याच विनंतीनंतर आंदोलक हे खाली उतरले. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशनवर काही मराठा आंदोलक दहीहंडीचे थर रचताना दिसतायत. त्यातील सर्वात तरूण हा दंड थोपटतोय. तर बाकीच्या आंदोलकांकडून खाली घोषणाबाजी करण्यात आली. सीएसएमटीवर स्थानकावर दोन मराठा आंदोलक कुस्ती करताना दिसत आहेत. तर आजूबाजूचे काही मराठा आंदोलक हे कुस्ती करणा-या आंदोलकांचा उत्साह वाढवतांना दिसले. ही तिसरी दृश्य देखील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरचीच आहेत. या दृश्यांमध्ये रेल्वे स्टेशनवर काही मराठा आंदोलक हे हलगी वाजवत आहेत. तर बाकीचे मराठा आंदोलक हे हलगीच्या तारावर ठेका घेताना दिसत आहेत. सीएसएमटी स्थानकावर प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी असते त्यात मराठा आंदोलकांच्या अशा हुल्लडबाजीमुळे प्रवाशांनाही मोठा त्रास सहन करावा लागतोय.

केवळ सीएसएमटीवरच नव्हे तर रेल्वे स्टेशनबाहेर देखील मराठा आंदोलकांची हुल्लडबाजी पाहायला मिळाली आहे. मुंबई महानगरपालिकेसमोरील बॅरिकेट्स खेळणं बनवून त्यावर बसून काही मराठा आंदोलक हे हुल्लडबाजी करताना दिसत आहेत. एवढंच नव्हे तर रेल्वे स्टेशनवर मराठा आंदोलक कवायती करताना देखील दिसलेत. यावेळी हलगीच्या तालावर मराठा आंदोलक हे कवायत करतांना पाहायला मिळालेत.





www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 347 मंगळवार दि. 02 सप्टेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# " गोष्ट धमाल गावाची " चे प्रकाशन !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रविवार दि.३१/०८/२०२५ रोजी सुप्रसिद्ध नाटककार किशोर पाटील यांच्या " गोष्ट धमाल गावाची " या नाटकाच्या हस्तलिखित प्रतीचे पूजन रायगड भूषण प्रा एल बी पाटील यांनी आणि प्रकाशन जीवन गावंड यांच्या शुभहस्ते झाले.तसेच
" एकविरा आई " या गाण्याच्या ध्वनिचित्र प्रतीचे प्रकाशन मुकुंद गावंड आणि सरपंच कलावती पाटील यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी आपल्या भाषणात रायगड भूषण प्रा एल बी म्हणाले की किशोर पाटील हे एक रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य नाट्यलेखक आहेत." हाय रे हाय" , " हा–या मारतोय हेलपाट्या " या नाटकांच्या यशा नंतर हे नाटक मोठे यश मिळविले. याचवेळी मुकूंद गावंड म्हणाले की," नाटक रंगमंचावर आणण्यासाठी धमक असावी लागते,ती धमक शिवशंकर नाट्य मंडळाकडे असून आम्हा मंडळींचे संपूर्ण सहकार्य राहील.   हा कार्यक्रम पिरकोन या गावी संपन्न झाला.शेखर पाटील यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन विलास गावंड यांनी केले.यावेळी दिनेश गाताडी ,महेंद्र गावंड,धिरेंद्र ठाकूर, जगदीश गावंड,अमृत म्हात्रे, राजेंद्र गावंड,एकनाथ म्हात्रे,छगन गावंड इत्यादींची
प्रमुख उपस्थिती होती. मंडळाच्या सभासदांनी उत्तम नियोजन केले.





# जरांगे पाटलांचे आंदोलकांना नियम पालनाचे आवाहन

----------

**मुंबई** / मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर मनोज जरांगे पाटील यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन आंदोलकांना आवाहन केले. जरांगे पाटील म्हणाले की,
मला वाटत अंतरवालीमध्ये हीच पोरं होती. आता मुंबईतही हीच पोरं आहे, ते इतरांना त्रास देणार नाही. त्यावेळी मीडिया सुद्धा सोबत होता, आजही आहे. पण मीडियाला त्रास झाला नाही, पण इथं तसं काही घडलं हे ऐकू येत आहे, त्यामुळे आम्हाला संशय येतोय. हे काही तरी षडयंत्र आहे. तुला आम्ही चांगलं ओळखून आहे. तू माझ्या नादला लागू नको जर मागे लागलो तर मी खुटा उपटीत असतो. माझी जात मला पुढे न्यायाची आहे, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.
मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरू आहे. आज सोमवारी मुंबई हायकोर्टाने मराठा आंदोलकांना दक्षिण मुंबईतून जाण्यासठी निर्देश दिले आहे. त्यानंतर जरांगे वकिलांनी आझाद मैदानात जाऊन भेट घेतली आणि माहिती दिली. त्यानंतर जरांगे यांनी मराठा बांधवांना आवाहन केलं. तसंच एक वेगळा संशयही व्यक्त केला.
‘ मी लेकरा बाळांसाठी कष्ट सहन करतो, तुम्हाला आरक्षण देऊन मोठं करायचं आहे म्हणून उपोषण करतोय, मला पाणी पिऊन तुमच्याशी बोलावं लागतंय तर काय उपोय आहे. तुम्हाला वारंवार का सांगावं लागत आहे. तुम्हाला जेव्हा बाहेर निघायचं आहे तेव्हा गाड्या घेऊन निघा. मला वाटतं अंतरवालीमध्ये हीच पोरं होती. आता



मुंबईतही हीच पोरं आहे, ते इतरांना त्रास देत नाही. मीडिया सुद्धा सोबत आहे.
मीडियाला त्रास झाला आहे, हे ऐकू येत आहे, त्यामुळे आम्हाला संशय येतोय. हे काही तरी षडयंत्र आहे. आम्हाला बदनाम करण्यासाठी हे काम सुरू आहे. रस्त्यावर देखील ही पोरं आहे. कुठल्या तरी राजकीय नेत्यांचं ऐकून ही लोक रस्त्यावर उतरली आहे. ही फक्त आंदोलनामुळे गप्प आहे. तू अंतरवालीमध्ये हेच केलं होतं, आता मुंबईतही तेच केलं. मुक मोर्चा काढला तेव्हाही हेच केलं होतं.
तुला आम्ही चांगलं ओळखून आहे. तू माझ्या नादाला लागू नको, जर मागे लागलो तर मी खूटा उपटीत असतो. माझी जात मला पुढे न्यायाची आहे. तुला चांगलं किती माहित आहे मी विचित्र आहे. तू आधी किती भिकारी होता हे मला सगळं माहित आहे, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरांगे पाटील यांनी तात्काळ परिषद घेवून आंदोलकांना अवाहन केलं.

### सामान्य मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका

‘जेवढे मुंबईत आले आहे’ त्यांना आपल्या गाड्या आल्या आहेत, त्या गाड्या मैदानात लावा, हे माझं शेवटचं सांगणं आहे. जर तुम्हाला आरक्षण नको असेल आणि कुणाचं ऐकून गोंधळ घालायचा असेल तर तुम्ही तुमच्या गावाला जाऊ शकतात. मला माझ्या जातीला आणि जातीच्या लेकराला मोठं करायचं आहे. हे बोलण्यासाठी पाणी प्यावं लागलं आहे.
तुमच्यामध्ये बुद्धी असेल तर मला किती वेदना आहे, हे समजून घ्या. त्यामुळे मला परत परत ते बोलायला लावू नका. मैदानात गाड्या लावा तिथेच निवांत झोपा, अख्ख्या मुंबईला जेवण पुरेल इतरं जेवण आलं आहे. गरीब मराठ्यांनी पाठवलं आहे. कुणाला त्रास होईल वागू नका.

### ‘नाहीतर गावी जा’

एकट्या मराठ्यांची पाच ते सहा जणांची ताकद आहे. आपल्याला त्रास झाला तर महाराष्ट्र अन्न आलं आहे. त्यामुळे मैदानात जा, पण न्यायालयाच्या नियमाचं पालन करा, मुंबईकरांना त्रास होणार नाही, असं वागा. फार काही लांब तुम्ही जात नाही. ग्राऊंडवर जाऊन झोपा. तुम्ही सगळे शांता राहा. आणि ज्यांना माझं ऐकायचं नाही त्यांनी गावी जा.
मी मेलो तरी इथून हलणार नाही. गोळ्या घेऊन येऊ दे, मी मरायला तयार आहे, फक्त तुम्ही शांत राहा. आता लगेच स्पीडने गाड्या काढा, मैदानावर घेऊन जा. ज्या ज्या मैदानात जागा असेल तिथे जाऊन थांबा. सरकाने पूर्ण सहाकार्य करण्याचं आश्वासन दिलं आहे. कुणीही रस्त्यावर गाड्या लावू नका, असं आवाहनही जरांगेंनी केलं.

### ते नुसत्या बैठका घेत आहेत

‘ सरकारन चर्चा करतंय बैठका करतंय हे मी तुमच्याकडून ऐकतोय. ते नुसत्या बैठका घेत आहे. मी चर्चा करायला तयार आहे. पण, सरकारचे काय पाय मोडले आहेत का.? आम्हीच चर्चाला यावं. तुम्ही सुद्धा चर्चेला येऊ शकतात. 150 मिटर अंतरावर चर्चा करण्यासाठी येता येत नाही का? शांतता किती कठीण आहे हे त्यांना अजून कळत नाही. दोन जणांचा बळी गेला आहे. शांततेचं महत्व देवेंद्र फडणवीस यांना कळत नाही, मस्तीखोर निर्णयामुळे मराठ्यांना तुच्छतेनं वागणूक दिली जात आहे.

# आयुष्मान कार्ड संदर्भात पनवेल महापालिकेची विशेष मोहिम

## मुख्यालयात लोकप्रतिनिधी सोबत बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

आयुष्मान कार्ड काढण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका विशेष मोहिम राबवित आहे. यासाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यास लोकप्रतिनिधींची बैठक आज महापालिका मुख्यालयात घेण्यात आली.
उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली. मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी यावेळी आयुष्मान कार्डचे महत्व लोकप्रतिनिधींना सांगितले. तसेच यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती सांगितली. महापालिकेच्यावतीने आयुष्मान कार्डसाठी काढण्यासाठी प्रभागनिहाय शिबीरे भरविण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.
आधार कार्ड लिंक आवश्यक
आयुष्मान कार्ड काढण्यासाठी रेशन कार्डला आधार कार्ड लिंक असणे गरजेचे आहे. आयुष्मान कार्ड काढण्याआधी रेशन कार्ड आधार कार्ड लिंक करण्यासाठीच्या शिबीरांचे आयोजन करणे महत्वाचे असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले. या संदर्भातील विविध सूचना ही यावेळी लोकप्रतिनिधींनी दिल्या. या सूचनांचे स्वागत करून आयुष्मानकार्ड शिबीरांबरोबरच रेशन कार्ड आधार



कार्ड लिंक करण्यासाठी शिबीरांचे आयोजन करण्याबाबत महसूल विभागासोबत चर्चा करून शिबिराचे नियोजन करण्यात येईल असे उपायुक्त कारलेकर व मुख्य आरोग्य अधिकारी यांनी सांगितले.
'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'
जिल्ह्यातील नागरिकांना 'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' (एबी–पीएमजेएवाय) 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय) यांचा लाभमिळावा, यासाठी पालिका प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.
या अंतर्गत नागरिकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' तयार करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, यामध्ये एक हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे. तसेच कुटुंबातील ७० वर्षांवरील सदस्यांना 'आयुष्मान भारत वय वंदना कार्ड'च्या माध्यमातून अतिरिक्त पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे आयुष्मान भारत गोल्ड कार्ड असणे बंधनकारक आहे.
याशिवाय आशा स्वयंसेविका, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच स्वस्त धान्य दुकानदार (रेशन दुकानदार) यांच्या माध्यमातूनही कार्ड तयार करता येईल. 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये लाभार्थी उपचार घेऊ शकतात. जास्तीत जास्त नागरिकांनी या विशेष मोहिमेत सहभाग नोंदवून स्वतःचे व आपल्या कुटुंबीयांचे कार्ड त्वरित काढून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.
शासनाने हे कार्ड बनविण्याची प्रक्रिया आता सुलभ केली असून, नागरिकांना गुगल प्ले स्टोअरवरील 'आयुष्मान ॲप' डाउनलोड करून किंवा https://beneficiary.nha.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन स्वतःच 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड' तयार करता येईल

# उलवेचा चिंतामणी गणेशोत्सवात फॅन्सी ड्रेस स्पर्धेला मुले-मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवेचा चिंतामणी चे घेतले दर्शन

**दैनिक युवक आधार**
**उलवे/ आण्णासाहेब आहेर**

संकल्प सामाजिक संस्थेच्या आयोजनात उलवेचा चिंतामणी सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ चे सेक्टर–१९,उलवे रोड येथे फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे भव्य आयोजन रविवार,दिनांक ३१,ऑगस्ट रोजी करण्यात आले होते,सदर स्पर्धेमध्ये एकूण ६५ स्पर्धकांनी भाग घेतला भव्य दिव्य आयोजनात स्पर्धा यशस्वी संपन्न झाली याठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थिती दर्शवत उलवेचा चिंतामणी श्री गणेशाचे दर्शन घेतले,स्पर्धेत लहानग्यांनी ० ते ५ हा वयगट,६ ते १० वयोगट व ११ ते १६ वयोगटातील मुलांनी सहभागी होत विविधरंगी वेशभूषा परिधान करून आपल्या कला–कौशल्याची चमक दाखवली.देवी–देवतांचे रूप,धार्मिकता, स्वातंत्र्यसैनिक,तर काहींनी आधुनिक


उलवेचा चिंतामणी गणेशोत्सवात फॅन्सी ड्रेस स्पर्धेत कलागुणांना वाव,मुले-मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

समाजप्रेरक संदेश देणारे परंपरागत वेश परिधान केले.त्यामुळे संपूर्ण परिसरात एक वेगळेच सांस्कृतिक वातावरण रंगून गेले.
मुलांच्या निरागस अभिनयाने व आकर्षक वेशभूषांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. पालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या मुलांचे मनोबल वाढवले,स्पर्धेचे परीक्षक म्हणून विद्या संभेराव पोदार जम्बो किड्स उलवे सेक्टर–२०,ब्रँच स्कूल इन्चार्ज यांनी काम पाहिले
प्रत्येक गटात एक ते तीन क्रमांक विजेते जाहीर करत विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र जाहीर केले,श्री गणेश देव–देवता परिवाराला विशेष पारितोषिक जाहीर करण्यात आले गणेशोत्सव हा केवळ धार्मिकतेपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमधून नवीन पिढीला संस्कार देण्याचा प्रयत्न करणे हीच या उपक्रमाची खासियत ठरली.सदर स्पर्धेत निवेदिका म्हणून सौ.अद्वैता संकल्प घरत यांनी काम पाहत कार्यक्रमाला रंगत आणली,
संकल्प सामाजिक संस्थेकडून सर्व सहभागी स्पर्धक व पालकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत,
गणेशोत्सवामध्ये प्रत्येक दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सर्व जाती धर्माच्या लोकांनी ह्या गणेशोत्सवाला सहयोग दर्शवलेला असल्याचे मत समाजसेवक संकल्प घरत यांनी मत व्यक्त केले

# जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी मनिषाताई चवरे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

मराठा सेवा संघाचा स्थापना दिवस आणि ३५ वा वर्धापन दिनानिमित्त बीड येथे रविवार दि ३१ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आली.
जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्ह्याच्या कार्याध्यक्षपदी मनिषाताई महेश चवरे तर बीड जिल्हा संघटकपदी अड. निर्मलाताई विलास सोनवणे यांची निवड करण्यात आली.जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई माने आणि जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा प्रा.संगीताताई शिंदे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन निवड केली.
या प्रसंगी एम.बी.बी.एस.परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.
या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक ठाकरे हे होते. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक गोविंद कदम, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे,डॉ. उर्मिलाताई शिंदे,डॉ.शरद शिंदे आदी मान्यवर तर महिला,पुरुष,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी मनिषाताई चवरे व अड निर्मलाताई सोनवणे यांच्या निवडीबद्दल संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष



प्रा शशिकांत कन्हेरे,सुवर्णाताई गि–हे,इंजि. तानाजी जंजिरे,लक्ष्मण रेडेकर,अड सीताराम पोकळे,बन्सीधर मोरे,शिरीष थोरवे,भास्करराव निंबाळकर,अविनाश जगताप यांच्यासह मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी,कार्यकर्त्यां व आदींनी अभिनंदन केले आहे.

# श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळ मोटेगाव'चा आदर्श उपक्रम



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकूर**

यंदा 'श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळ, मोठेगांव' यांनी तरुण पिढीच्या पुढाकाराने 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना यशस्वीरित्या राबवून एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे. यावर्षी प्रथमच हा निर्णय घेण्यात आला असून, संपूर्ण परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

**तरुणाईचा पुढाकार आणि गावकऱ्यांचा पाठिंबा**

दरवर्षी गणेशोत्सवात अनेक लहान-मोठी मंडळे आपापल्या विभागात गणपती बसवत असत. यामुळे वर्गणी गोळा करण्यापासून ते मिरवणुकीपर्यंत अनेक ठिकाणी स्पर्धा आणि तणावाचे वातावरण निर्माण होत होते. यावर तोडगा म्हणून व गांवातच श्री सिद्धिविनायकाचे अतिशय पुरातन व मनोरथ सिद्धिस नेणारे व भक्ताच्या मनोकामना पूर्ण करणारे निसर्ग रम्य मंदिर असल्यामुळे गावातील तरुणांनी पुढाकार घेत 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेची मांडणी केली. त्यांनी गावातील सर्व गणेश मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. तरुणाईच्या या सकारात्मक भूमिकेचे गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले आणि एकजुटीने हा निर्णय घेतला.

**सामाजिक बांधिलकीचा गणेशोत्सव**

या निर्णयामुळे यंदा मोठेगांवात अत्यंत शांत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करत असुन एकाच ठिकाणी गणपती बसवल्यामुळे सर्व गावकऱ्यांना एकत्र येऊन पूजा-अर्चा आणि आरतीमध्ये सहभागी होता आले. या गणेश मंडळातर्फे केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत दहा दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, व तंज्ञ डॉ दररोज विविध आरोग्याचे निदान करत असुन त्यामध्ये डॉ धंनजय तनपुरे (नेत्ररोग तज्ञ) डॉ शरद इंगळे (बालरोग तज्ञ) डॉ विनीत देशमुख (बिपी शुगर अस्थमा थायरॉईड) डॉ आशिष चव्हाण (जनरल फिजीशियन) डॉ गजानन बगडीया (अस्थिरोग तज्ञ) व तसेच डॉ सौ.मेघा बगडीया (त्वचा रोग तज्ञ) इत्यादी या प्रमाणे गांवातील नागरीकांना उपचार करत आहेत व नागरीक सुध्दा आरोग्य शिबीरामध्ये आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिबीरामध्ये खुप मोठ्या प्रमाणात आपली तपासनी करून उपचार घेत आहेत त्यामध्ये रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक कार्यांचा सुध्दा समावेश होत आहे

**विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचा उत्साह**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश होता. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**एकतेचा संदेश**

एकत्रित वर्गणीतून वाचलेल्या पैशांचा वापर मंडळाने सामाजिक कार्यासाठी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निधीतून गावातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे किंवा गावातील स्वच्छता अभियान राबवणे असे उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. 'श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळाचा' हा निर्णय गावातील एकतेचे प्रतीक बनला असून, आगामी काळात इतर गावांनीही यातून प्रेरणा घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



नेरेपाडा, पनवेल येथील श्री मयूर गुरूनाथ तांबडे यांच्या घरी विराजमान झालेला बाप्पा
( दैनिक युवक आधार )

## अड्याळ पोलीस स्टेशन येथे गणरायाला ढोल ताशांच्या गजरात शेवटचा निरोप



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा**

पवनी तालुक्यातील अड्याळ पोलीस स्टेशन येथे दिनांक 27 ऑगस्टला गणरायाची स्थापना करण्यात आलेली होती व आज दिनांक 1 सप्टेंबर 2025 ला सायंकाळी 8 वाजता ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत 6 व्या दिवशी गणराया बाप्पाला अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी अड्याळ पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी, अड्याळ पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले पोलीस पाटील, पत्रकार व नागरिक व महिला बहुसंख्येने गणेश विसर्जनाच्या वेळेस उपस्थित होते. सर्वांना अड्याळ पोलीस स्टेशन तर्फे जेवणाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती. गणेश विसर्जन रॅलीत सर्व कर्मचारी व सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांनी सुद्धा गणेश विसर्जनाचा आस्वाद घेतला.



पनवेल मधील बालाजी सिंफनी, सुकापूर मध्ये राहणारा २३ वर्षीय मराठी मुलगा निखिल डाकवाले हा काही दिवसांपासून त्याच्या सोसियल मिडिया वर महाराष्ट्र, मराठी भाषे विरोधात व मनसे विरोधात आक्षेपार्ह पोस्ट करत होता आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेल तालुका मनसे ह्यांच्या निदर्शनास पोस्ट आली ज्या मध्ये त्याने मराठी भाषेचा, मराठी जनतेचा अपमान करत आक्षेपार्ह अशी भाषा त्याने वापरली होती त्यावर त्वरित पनवेल तालुका सुकापूर शाखा उपाध्यक्ष संतोष गायकवाड, वाहतूक सेना चिटणीस तुषार शेजवळ, सुकापूर विभाग अध्यक्ष राज क्षीरसागर व इतर महाराष्ट्र सैनिक ह्यांनी मनसे स्टाईलने धडा दिला व मराठी माणसांची, महाराष्ट्राची माफी मागून घेतली व पुढे अशी चूक त्याच्या कडून होणार नाही अशी अद्दल त्याला घडवून आणली आहे.

## कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव वतीने आरोग्य शिबीर संपन्न!



**दैनिक युवक आधार**
**मुबंई (दत्ता खंदारे )**

कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी तर्फे रविवार दि. ३१ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागातील अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणी करुन घेतली. या आरोग्य शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमाचे आयोजक सौ माधुरी गायकवाड होत्या तर कार्यक्रमास सचिव श्री मसाजी श्रीपती होटकर, उपाध्यक्ष श्री गिरीराज शेरखाने तसेच खजिनदार श्री विजय बाबुराव शिंदे, श्री वामन पोळ, गौतम होटकर व श्री मंगेश खरटमल हे उपस्थित होते.

## भा. मा. कन्या शाळेची विद्यार्थिनी कृष्णाजी प्रकाश घोडके राज्यस्तरीय श्रीमद् भागवत गीता ज्ञान स्पर्धा परीक्षेत तृतीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**.... तालुका प्रतिनिधी.रणजितसिह. ठाकूर**

स्थानिक : रिसोड तालुक्यातील नेहमीच विद्यार्थिनींना वेगवेगळ्या कलागुणांना वाव देणारे एकमेव मुलीचे भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थिनींचा पुन्हा एकदा राज्यस्तरावर सन्मान. मागील आठवड्यात राज्यस्तरीय श्रीमद् भागवत गीता ज्ञान स्पर्धा परीक्षाचे संपूर्ण महाराष्ट्रभर या परीक्षेचे आयोजन अखिल भारतीय श्रीकृष्ण प्रबोधन परिषद बुलढाणा द्वारा केले असता. महाराष्ट्रातून एकूण 25000 विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट



झाले होते. तसेच वाशिम जिल्ह्यातून 2350 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. ही परीक्षा लेखी स्वरूपाची असून श्रीमद् भागवत गीतेवर आधारित होती.त्यामध्ये भारत माध्यमिक कन्या शाळेची विद्यार्थिनी कृष्णाली प्रशांत खोडके हिने या परीक्षेत महाराष्ट्रात तृतीय क्रमांक व वाशिम जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावून पुन्हा एकदा भारत माध्यमिक कन्या शाळेचे नाव महाराष्ट्रभर प्रसिद्ध केले आहे. तिचा गुणगौरव 28 ऑगस्ट रोजी श्री लोणारकर बाबा आश्रम अजिंठा रोड बुलढाणा येथे महंत श्री. लोणारकर बाबा महानुभाव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉक्टर राजेंद्र शिंगणे साहेब माजी आरोग्य मंत्री, शेतकरी नेते रविकांत तुपकर हे असून या मान्यवरांच्या हस्ते कृष्णाली खोडके हिला सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम रुपये 701 देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या सन्माननीय मंजुषा सु. देशमुख मॅडम, व संस्कृत विषयाचे मार्गदर्शक शिक्षक वसंत बुंधे ( शास्त्री ) सर यांना सुद्धा सन्मानचिन्ह आणि शाल, श्रीफळ देऊन सन्मानित केले. कृष्णाली खोडके हिच्या यशाबद्दल तिचे कौतुक सन्माननीय प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम, पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर सर्व शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग यांच्यासह विविध स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# स्वा.सै.पं.ध.थेपडे माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात.

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

. म्हसावद येथील कै स्वातंत्र्य सैनिक पं ध थेपडे माध्यमिक विद्यालयात दिनांक 31ऑगस्ट 2025 वार रविवार रोजी माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व भावनिकनिसर्ग रम्य वातावरणात पार पडला,शाळेत तब्बल 22वर्षानंतर माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र जमल्याने आनंदाचे आणि जुन्या आठवणींचे क्षण भर पावसात अनुभवायला मिळाले यावेळी शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री वाय आर जाधव सर,माजी प्रा राजू पाटील सर, श्री डी एस खोडपे सर, शाळेचे उप मुख्याध्यापक श्री जी डी बच्छाव सर , एस के भंगाळे सर, संजय पवार सर, देशमुख सर, श्री एस एम पिंगळे सर,सौ,




चव्हाण मॅडम, सौ वंदना मॅडम, एस डी हुजरे मॅडम, आदी शिक्षक उपस्थित होते, यावेळी प्रथम गुरू पूजन करून सर्व गुरुजनाना सर्व विद्यार्थ्यांनी नतमस्त होऊन नमन करण्यात आले, यावेळी शिक्षकांनी देखील यावेळी आशीर्वाद दिले,यावेळी विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण व व्यसन मुक्तीवर नाटिका करण्यात आले,तसेच श्री वाय आर जाधव सर यांनी व्यसन मुक्ती वर मार्गदर्शन केले,तर श्री राजू पाटील सर यांनी तुमच्या येणाऱ्या पिढीला मोबाईल पासून लांब ठेवा असे मार्गदर्शन केले, बच्च्छाव सर यांनी तुमच्या मुलांना संस्कार चांगले लावा व सर्वांनी आपल्या आई वडिलांचा मान ठेवा व त्याचा आदर करा असे मोलाचे मार्गदर्शन केले व श्री संजय पवार सर यांनी सांगितले की आप बीण जे काही गरीब असतील त्यांना तुम्ही तुमच्या परीने काही तरी मदत करा व ज्येष्ठांचा मान ठेवा, असे तोलामोलाचे मार्गदर्शन यावेळी सर्व शिक्षकांनी केले,यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे मन भरून आले यावेळी मुलामध्ये बबन वाघ,गिरीश शार्दुल,वाल्मीक पाटील, अतुल पाटील, किशोर बडगुजर, जयंत पाटील,राहुल साबळे,राहुल, रजाणे, तृषाल मराठे,मोहन मिस्तरी, फिरोज पटेल,गुलाब चौधरी,विजय मोरे,संदीप सोनवणे,अतुल शिवदे,शरद पवार, योगेश चिंचोरे,योगेश पाटील,आशिष चव्हाण,मोहसीन शेख, मिलिंद सोनवणे ,संदीप जाधव,गोरख बेलदार,आदी तर मुलींमध्ये हेमलता महाजन, दीपमाला जाधव,कविता पाटील, अंकिता कटारिया,गायत्री माळी,सुमित्रा सोनवणे, शारदा पाटील, सुवर्णा माणके,पूनम पाटील,हर्षदा पाटील, ज्योती शिवदे,रेखा चव्हाण,सुरेखा पाटील, ज्योत्स्ना भट, चित्रा चव्हाण, वैशाली कदम, अर्चना मराठे आदी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते

## भीम आर्मी खमारी तर्फे नवनियुक्त तंटामुक्ती अध्यक्ष यांचे स्वागत



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

दिनांक 31/08 /2025 ला खमारी (बुटी) तहसील जिल्हा भंडारा येथील नवनिर्वाचित तंटामुक्ती अध्यक्ष श्री. बालारामजी पवनकर यांचे भीम आर्मी संघटन जिल्हा भंडारा च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी भीम आर्मीचे भंडारा जिल्ह्याचे जिल्हा संघटक - महेंद्रजी बन्सोड, भंडारा तालुका उपाध्यक्ष-युगांतरजी मेश्राम ,भीम आर्मीचे कार्यकर्ते - असुराजजी मारवाडे, अजयजी बन्सोड ,राजनजी उके, जगदीशजी मोहरकर ,पुरुषोत्तमजी मेश्राम ,दिनेशजी पेशने ,अशोकजी फेंडर ,असे अनेक भीम आर्मीचे कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित तंटामुक्ती अध्यक्ष बालारामजी पवनकर यांनी आपले मत व्यक्त केले आणि ते म्हणाले की गावात शांतता टिकवून ठेवण्यासाठी आणि गावाला तंटामुक्त करण्यासाठी मी नेहमी प्रयत्नशील राहीन. तसेच भिम आर्मि तालुका उपाध्यक्ष तडफदार युवा नेतृत्व युगांतरजी मेश्राम यांनी आपले मत व्यक्त केले आणि ते म्हणाले की ज्या गावात ज्या जिल्ह्यात ज्या तालुक्यात जिथे जिथे अन्याय अत्याचार होईल तिथे तिथे भीम आर्मी संघटन न्याय देण्याचे काम करेल व करत राहील. कारण आमच्या संघटनेचे ब्रीद वाक्यच हे आहे,की -"जोर जुल्म की टक्कर में संघर्ष हमारा नारा है" असे ते म्हणाले*.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle



पवन सोसायटी सेक्टर सात खांदा कॉलनी येथील गणेश उत्सव गणपती बाप्पाची आकर्षित मूर्ती

( दैनिक युवक आधार )

# साहित्य सम्राट लोकशाहीर कॉम्रेड डॉ अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त देवणी खुर्द डीजीमुक्त जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी देवणी खुर्द येथे साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे समाज मंदिर येथे सकाळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ, बाबासाहेब आंबेडकर, लहुजी वस्ताद यांच्या प्रतिमेची पूजन करून ध्वजारोहण गोपाळ व-हाडे पोलीस उपनिरीक्षक यांच्या शुभहस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य माधव केरबा रणदिवे ,ग्रामपंचायत सदस्य सोनाली रणदिवे, यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा, सदाविजय पवार, सरपंच यशवंत कांबळे ,उपेक्षितांचे




नेते वसंत बीबीनवरे, संजय गांधी कमिटीचे सदस्य अनिल कांबळे,प्रा, रतन सूर्यवंशी दवहिप्परगेकर, पद्माकर कांबळे आर्टी, दिलीप सूर्यवंशी,श्याम रणदिवे, अंगणवाडी कार्यकर्ती सरोजा गायकवाड,मदतनीस आयोध्या सूर्यवंशी, अशा कार्यकर्ती शोभा रणदिवे, रंजना रणदिवे कमल रणदिवे ,सत्यवती रणदिवे, कल्पना रणदिवे, गंगाबाई गायकवाड,भारतबाई रणदिवे, अनिता रणदिवे,अविद्या रणदिवे, शिवार्ता रणदिवे,उपस्थिती होती तसेच या जयंती समितीचे अध्यक्ष लक्ष्मण रणदिवे पत्रकार तथा मानवी हक्क अभियान संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष, उपाध्यक्ष वामन रणदिवे, सचिव सुखंवत रणदिवे, सचिव लक्ष्मण पुंडलिक रणदिवे, मिरवणूक अध्यक्ष, अजय रणदिवे, उपाध्यक्ष रमेश रणदिवे, सचिव ज्ञानेश्वर रणदिवे, खजिनदार दीपक रणदिवे, सहखजिनदार खंडू रणदिवे, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, रामदास सूर्यवंशी, ज्योतीराम रणदिवे, विजयकुमार सूर्यवंशी,सागर रणदिवे, रवी रणदिवे लहुजी शक्ती सेना, गंगाधर रणदिवे,कृष्णा रणदिवे, योगेश रणदिवे, तुकाराम रणदिवे,रुपेश सूर्यवंशी, प्रसाद सूर्यवंशी, दिनेश रणदिवे, दादाराव गायकवाड, दत्ता रणदिवे,संग्राम रणदिवे,केशव रणदिवे,बालाजी रणदिवे,सत्यवान रणदिवे, देविदास रणदिवे, मनोज रणदिवे,शैलेश सूर्यवंशी, सुरेश रणदिवे , ज्ञानेश्वर व्यंजने,दिगंबर रणदिवे, प्रशांत रणदिवे, विद्यार्थ्यांचे मनोगत व्यक्त करण्यात आले तसेच शालेय वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण रणदिवे पत्रकार आभार धनाजी रणदिवे सामाजिक कार्यकर्ते यांनी मांडले @ साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौका पासून भव्य मिरवणूक सायंकाळी अमित उर्फ बंटी सूर्यवंशी नगरसेवक यांच्या शुभहस्ते अण्णाभाऊ साठे प्रतिमेची पूजन करून मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आले ही मिरवणूक शांतीदूत बुद्ध विहार, या ठिकाणी गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन अमित उर्फ बंटी नगरसेवक यांच्या हस्ते पूजा करण्यात आली,अण्णाभाऊ साठे चौकात संदीप पाटील यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, शिवाजी महाराज चौकात नारायण उर्फ नाना पाटील,भरत गिरी,नामदेव धुळशट्टे बिट जामादार त्यांच्या हस्ते शिवाजी महाराजांची प्रतिमेचे पूजन करण्यात आले नंतर शांतिदूत बुद्ध विहार येथे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून समाप्ती करण्यात आली ढोल ताशाच्या गजरात आणि फटाक्याची आतषबाजी करीत मिरवणूक काढण्यात आली. यशस्वितेसाठी जयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधवांनी परिश्रम घेतले

# रिसोड तालुक्यात ग्रामीन परिसरात सर्रास होते मुरुमाचे उत्खनन.!

## संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, कारवाई होईनाच.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

रिसोडः-अवैध मुरुम वाहतुक माफियांवर कायदेशीर कारवाई होईल का? अशी सर्वसामान्य नागरिकामधून विचारणा होत आहे. यावर प्रशासन कारवाई करणार का नाही हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. यावर तलाठी मंडळ अधिकारी कारवाई का करत नाही ? असाही प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. या अवैध वाहतूकमुळे महसूलचा काय फायदा आहे या असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेते. रिसोड तालुक्यातील भर जहागीर परिसरात मोठ्या प्रमाणावर मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन जेसीबीने सुरू आहे. आहे. याकडे महसूल विभाग व तहसीलदारांचे हेतू पुरस्सर दुर्लक्ष होत असल्याने शासनाचा मोठा महसूल बुडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. भर जहागीर परिसरात भर दिवसा विविध भागातून शासकीय जमीनीचे जेसीबीने खोदकाम करुन मुरुमाचे अवैध वाहतूक सुरू आहे.

यावेळी रिसोड चे तहसीलदार यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर मडळ अधिकारी यांच्याशी संपर्क केला असता मी पथक पाठवतो आणि कारवाई करतो असे उत्तर दिले. मात्र, कसलीही कारवाई त्यांनी केली नाही. दरम्यान दररोज 20 ते 30 ट्रॅक्टर आणि हायवा टिप्परद्वारे अवैध वाहतूक दिवसाढवळ्या होत आहे. ट्रॅक्टर आणि जेसीबी वाले आम्ही तहसीलदार . मडम बोललो आहे तुम्हाला काय करता येईल ते करा अशी भाषा स्थानिक करा. नागरिकाना करत आहेत.

# परतूर बस आगारातील चालक शेख अब्दुल रहीम चाऊस यांचा सेवागौरव सोहळा संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

परतूर येथील बस आगारातील चालक शेख अब्दुल रहीम चाऊस यांचा वयानुरूप सेवानिवृत्त झाल्याबद्दल परतूर आगाराच्या वतीने सेवागौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख माधुरी देशमुख या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त विभागीय वाहतूक अधिकारी पंडित चव्हाण,मुख्यध्यापक संजय जाधव,पत्रकार योगेश बरीदेयांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आगार प्रमुख माधुरी देशमुख यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या आगार विभागात सर्वात महत्वाचे पद हे चालकाचे आहे प्रवासी सुरक्षा ला प्राधान्य देत सर्वानी आपली जवाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली पाहिजे तसेच अब्दूल राहिम यांनी विना अपघात सेवा केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वाहतूक नियंत्रक श्रीमती सुरेखा साळवे,श्रद्धा कुलकर्णी, नाथा ढेंगळे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम पी गोडबोले यांनी केले तर भुजंग गोरे यांनी आभार मानले.

# विंचूर येथे गणपती विसर्जन व ईद शांततेत पार पडाव्यात यासाठी पुन्हा एकदा पोलिसांचा रूट मार्च

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर (प्रतिनिधी) :**

गणेश विसर्जन सोहळा व बकरी ईद हे दोन महत्त्वाचे सण शांततेत व उत्साहात साजरे व्हावेत, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना दृढ राहावी यासाठी विंचूर शहरात पोलिसांच्या वतीने भव्य रूट मार्च काढण्यात आला. हा रूट मार्च १ सप्टेंबर रोजी लासलगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, उपनिरीक्षक मोहन पाटील व किरण साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. रूट मार्चची सुरुवात विंचूर पोलिस चौकी येथून झाली. त्यानंतर मेन रोड, कॉलेज रोड, ग्रामपालिका रोड, नेहरू चौक, बजरंग मंडळ, सिद्धार्थ नगर, बाजार गल्ली, मारवाडी पेठ आदी भागातून शिस्तबद्ध पद्धतीने पोलिस दलाने संचलन केले. टवटवीत गणवेशातील पोलिसांचे पथसंचलन पाहून नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सव व बकरी ईद या दोन्ही सणांचा कालावधी हा सामाजिक सलोखा टिकवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे पोलीस प्रशासनाने अधोरेखित केले. नागरिकांनी शांतता, भाईचारा व एकोप्याची परंपरा जपत उत्सव साजरे करावेत, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी यावेळी केले. रूट मार्च दरम्यान नागरिकांनीही पोलिस दलाचे स्वागत केले. त्यामुळे शहरात सुरक्षितता व सामंजस्याचे वातावरण अधिक दृढ झाले असून, आगामी सणावार आनंदात आणि शांततेत पार पडतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.



# उसलीचा तरुण कलाकार, मिलिंद बाचलचे पुनरागमन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यात उसर्ली मध्ये रहाणार मुळचा सोलापुर जिल्ह्यातील पाटकूल सारख्या ग्रामीण मातीतून उगवलेला तरुण कलाकार, मिलिंद बाचल, यांचे चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा दिग्दर्शनात नव्या जोमाने धडाकेबाज पुनरागमन



झाले आहे

'एक दिवसात बाप्पा मोरया आणि बाप्पाची टमा' ही दोन गाणी रिलीज करण्याचा अनोखा प्रयोग मिलिंद यांनी करून दाखवून प्रेक्षकांना आनंदाची मेजवानीच दिली आहे मिलिंद यांनी मास मीडियाचे शिक्षण घेतले असून लहानपणापासूनच त्यांना चित्रपट क्षेत्राची आवड होती. आणि पाटकूल सारख्या ग्रामीण भागात राहूनही अगदी कमी वयातच युवा दिग्दर्शक म्हणून स्वतःला सिद्ध केले. समाजातील संवेदनशील प्रश्नांवर त्यानी अनेक गाणी बनविली आहेत की जेणेकरून त्यातून समाजापर्यंत योग्य तो संदेश

पोहोचावे आणि समाजाने त्यातून काहीतरी चांगले शिकावे ही त्यांची खरी तळमळ दिसून येते. सोलापूर, पुणे, पनवेल, नाशिक अशा निरनिराळ्या भागात जाऊन मिलिंद बाचल यांनी अनेक गाणी चित्रित केली असून सिनेश्रुष्टितील स्पर्धेच्या युगात संघर्ष करत असलेल्या अनेक मुलामुलींना त्यांनी पुढे जाण्यास संधी दिली आहे.

दिग्दर्शनच नाही तर त्यासोबत ते उत्तम लेखक, आणि संकलक सुद्धा आहेत. शेतकरीगीत, शिवगीत प्रेमागीत, लावणी, विठ्ठल भक्तीगीत अशा विविध विषयांवर

त्यांनी गाणी केली आहेत. मायबोली, आणि संगीत मराठी या चॅनेल्सवर त्यांची गाणी गाजत आहेत. दिग्दर्शन क्षेत्रापासून काही काळ दूर राहून पुन्हा नव्या जोमाने प्रेक्षकांच्या भेटीस आलेला हा युवक आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीतून आणि ग्रामीण रसरशीत भावनेतून पुन्हा एकदा सर्वांची मन जिंकणार यात तिळमात्र शंका नाही.'बाप्पा मोरया' आणि 'बाप्पाची टमा' या दोन गाण्यानी नुसते दिग्दर्शन क्षेत्रात पुनरगमनच केले असे नाही तर त्यांनी यात छोटीशी भूमिकाही निभावल्या

# मराठा आरक्षणावर विशेष प्रवचन रूपी व्याख्यान हभप दिलीप महाराज आमले

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ वार्ताहर**

एक मराठा लाख मराठा मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासह इतर मागण्यांसाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील हे मुंबईत दाखल झाले. मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी आझाद मैदानावर आंदोलनासाठी परवानगी दिली परंतु मोठ्या प्रमाणात मराठा बांधवांना असल्याने व सतत पाऊस थंडी यापासून संरक्षण करण्यासाठी नवी मुंबई नेरूळ याठिकाणी अनेक ठिकाणी जेवण व राहण्याची सोय केली होती यावेळी पुणे विद्यापीठ विद्याभवन शाळा सेक्टर 18 येथे अनेक मराठा बांधव हजारोंच्या संख्येने मराठा




बांधवांना मराठा आरक्षण मिळालेवर आपल्याला काय काय सोयी शाळा कॉलेज महाविद्यालय सरकार मध्ये नोकरी लागणे साठी येणारे अडचणी वर कशी मात होईल याविषयी आपला माणूस प्रवचनकार हभप श्री दिलीप किसनराव आमले प्रमुख मार्गदर्शक व्यसनमुक्ती जनजागृती (एक मराठा लाख मराठा) एक कडवड प्रवचन रूपी/ व्याख्यान आयोजित करण्यात आले होते या व्याख्यान चालू असताना अनेक मराठा बांधव यांनी एक मराठा लाख मराठा, तुमचं आमचं नातं काय जय जिजाऊ जय शिवराय, ओबीसी मधुन आरक्षण मिळालेच पाहिजे,आरज्ञण आमच्या हक्काचे, तर ७५ वर्ष वयोवृद्ध हभप कराळे महाराज धाराशिव यांनी त्यांना आरक्षण नसल्याने मुलांना नातु नातेवाईक यांना सरकारी नोकरी पसुन कसं लांब रहावे लागले सांगताना हे डोळे भरून अश्रू अनावर झाले त्यावेळी प्रवचनकार आमले महाराज सह उपस्थित असलेले सर्वांचं डोळे भरून आले तरी सर्वांनी प्रतिज्ञा केली कि आरक्षण घेउनच आपल्या गावात आनंदाने गुलाल घेऊनच जायचं यावेळी नेरूळ विभागातील अनेक सामाजिक शैक्षणिक दारूबंदी धार्मिक वारकरी संप्रदायातील नागरिक व महाराष्ट्रातुन आलेले हजारो मराठा बांधव उपस्थित होते प्रवचन सेवा झाले नंतर त्याच ठिकाणी सर्वांची जेवण व राहण्याची सोय करण्यात आली

# विक्रम साबळे फाउंडेशन आयोजित 'मन की बात'कार्यक्रम संपन्न

## विक्रम साबळे फाउंडेशन गणेश उत्सव सजावट स्पर्धा निकाल जाहीर ...

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

विक्रम साबळे फाउंडेशन आयोजित मन की बात कार्यक्रम भाजप कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत महाराजा मंगल कार्यालय सभागृहाच्या ठिकाणी रविवारी दि. 31 ऑगस्ट रोजी सकाळी 11:00 वाजता सुंदर नियोजन पध्दतीने संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवाद बैठकीतील अनेक मुद्द्यावर सविस्तरपणे विश्लेषण साधत कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा व प्रोत्साहन आल्याचे पाहायला मिळाले.


तर दुसरी कडे सायंकाळी विक्रम साबळे फाउंडेशन गणेश उत्सव सजावट स्पर्धा २०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. उत्सव परंपरा, अभिमान संस्कृती अश्या संकल्पनेतून सजावट कलेच्या गुणवत्तेत निकाला अंती अथर्व घारे यांना प्रथम पारितोषिक 11 हजार 111 तर श्रीयंश पुरी यांना द्वितीय पारितोषिक 7 हजार 777 तसेच तृतीय पारितोषिक राजा कुंभार यांना 5 हजार 555 हि रोख बक्षिसे आणि सर्व विजेत्यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले .यावेळी माजी नगरसेवक अविनाश तावडे व विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे , इंदरमल खंडेलवाल, हेमंत नांदे, अश्विनी अत्रे भाजप शहर महिला मोर्चा अध्यक्ष ,सुनील नांदे आदी शिष्टमंडळ उपस्थित होते.




# विंचूरमध्ये क्षिरसागर कुटुंबात पारंपरिक उत्साहात गौरी-गणपती व्रत

दैनिक युवक आधार
जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी

(विंचूर) – हिंदू संस्कृतीतील महत्वाचा सण असलेले गौरी-गणपती (महालक्ष्मी) व्रत विंचूर येथील क्षिरसागर कुटुंबात पारंपरिक विधी आणि उत्साहात साजरे करण्यात आले. भाद्रपद शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर सुरू झालेल्या या व्रताला महिला मोठ्या भक्तिभावाने सामील झाल्या.



पहिल्या दिवशी सुवासिनींनी घंटानाद आणि औक्षण करून गौरींचे स्वागत केले. पंचांग मुहूर्तानुसार त्यांना साडी-चोळी व दागिने घालून साजरे करण्यात आले. भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवून पूजन करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी गौरी पूजन सोहळा पार पडला. करंज्या, पुऱ्या, लाडू, पुरणपोळी, सोळा भाज्या अशा विविध नैवेद्य पदार्थांची आरास करण्यात आली. दोन सुवासिनींना देवीरूप मानून त्यांना जेवण देऊन पूजन केले गेले. संध्याकाळी हळदी-कुंकू कार्यक्रम व गौरी दर्शनाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माहेरी आलेल्या मुलींमुळे वातावरण अधिक आनंदी झाले. रात्री भजने व गौरी गाण्यांनी जागरण रंगले.

तिसऱ्या दिवशी विसर्जन विधी पार पडला. दही-भाताचा नैवेद्य दाखवून आरत्या झाल्या. पाच सुवासिनींच्या हस्ते गौरींना उठवून त्यांचे विसर्जन करण्यात आले. उपस्थित महिलांना फुटाण्याचे वाटप करण्यात आले.

या तिन्ही दिवसांत क्षिरसागर कुटुंबासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभागी होऊन पारंपरिक परंपरा जिवंत ठेवली.

# यशवंत भाऊ पाटील गणेश मंडळाला एक किलो चांदी अर्पण

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर भाग्यनगर येथील यशवंत भाऊ पाटील मित्र परिवार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला एक किलो चांदीचा हार अर्पण करण्यात आला आहे देणगीदार गोविंद बापू नरुटे हे या मंडळाचे खजिनदार असून त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाल्यामुळे त्यांनी आपल्या मनातील इच्छा व प्रार्थना या गणपतीकडे केली असता हा चमत्कार झाला असल्याचे नरुटे यांच्या मनातील इच्छा पूर्ण झाल्यामुळे एक किलो चांदीचा गणपतीच्या चरणी अर्पण केला आहे.यशवंत भाऊ पाटील गणेश मंडळ हा गणपती भवानीनगर भाग्यनगर परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे भरपूर लोकांना याचा अनुभव आला असल्याची माहिती मंडळाचे कार्यकर्ते अरिफभाई तांबोळी व प्रतिक ढाकणे यांनी दिली.यावेळी मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.



# मिशन जरेवाडी पॅटर्नचा सकारात्मक प्रभाव सुरूच, ग्रामीण भागात शैक्षणिक क्रांती...

## २३ पर्यवेक्षकांच्या २३४ वेळा शाळा भेटीतून पाटोद्यातील ७५०८ विद्यार्थ्यांची गुणवत्ता दहा टक्क्यांनी वाढल्याचा निष्कर्ष , शिष्यवृत्ती आणि नवोदय परीक्षेतही यंदा विद्यार्थ्यांची भरारी

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(शेख महेशर ताहेर)-**
आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या मिशन जरेवाडी पॅटर्न मुळे पाटोदा तालुक्यातील प्राथमिक शिक्षण क्षेत्रात गेल्या सात महिन्यांत क्रांतिकारी बदल दिसून आला आहे. डिसेंबर २०२४ पासून सुरू झालेल्या या मोहिमेत तालुक्यातील २३ पर्यवेक्षकांनी तब्बल २३४ शाळांना भेटी देत ७५०८ विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. एप्रिल महिन्यापर्यंत १०% गुणवत्तावाढ झाल्याचे शिक्षण विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतही या पॅटर्नचा थेट परिणाम दिसून आला असून इयत्ता ५ वी व ८ वी च्या परीक्षेत यंदा तालुक्यातील तब्बल ३४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, दुर्गम डोंगराळ भागातील जरेवाडी शाळेतील २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. या यशामुळे जरेवाडी पॅटर्नची दखल आता राज्य पातळीवर घेतली जात आहे.



**गुणवत्तावाढीचे निष्कर्ष**
जानेवारी २०२५ मध्ये मिशन जरेवाडी पॅटर्नला सुरुवात २३ पर्यवेक्षकांनी २३४ वेळा शाळांना भेटी दिल्या ७५०८ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत एप्रिल २०२५ पर्यंत १०% वाढ तालुक्यातील अनेक शाळांमध्ये डिजिटल सुविधा व ग्रामस्थांच्या सहभागातून विजेची सोय, शिक्षण विभागाच्या तज्ञ पर्यवेक्षकांनी दर महिन्याला शाळांची तपासणी करत विद्यार्थ्यांची पातळी मोजली. 'निपुण भारत' अंतर्गत इयत्ता १ ली ते ३ री च्या विद्यार्थ्यांना वाचन व गणितीय कौशल्यांवर विशेष भर देण्यात आला. धाराशिव येथील शिक्षणतज्ज्ञांकडून पाटोदा तालुक्यातील ४९० शिक्षकांना तीन वेळा विशेष प्रशिक्षण दिले गेले. शिक्षकांनी बालकांना आवडेल अशा पद्धतीने अध्यापन सुरू केल्याने मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली, उपस्थितीत वाढ झाली आणि त्याचा थेट परिणाम गुणवत्तावाढीत दिसून आला.

शिष्यवृत्तीतील यश तालुक्यातील ३४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र एकट्या जरेवाडी शाळेतील २५ विद्यार्थी पात्र नवोदय प्रवेश परीक्षेतही अनेक विद्यार्थ्यांचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणा गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे म्हणाले, की "मिशन जरेवाडी पॅटर्नमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. शिक्षकांनी नवनवीन अध्यापन पद्धती आत्मसात केल्या आणि पालक व ग्रामस्थांचा सहभाग वाढल्यामुळे ही यशोगाथा शक्य झाली आहे. त्याच प्रमाणे डिजिटल शिक्षणाच्या संदर्भात देखील काही शाळांमध्ये विजेची समस्या असली तरी ग्रामस्थांनी त्या ठिकाणी लोकसहभागातून विजेची सोय केल्यामुळे डिजिटल शिक्षणावर कोणताही परिणाम होत नाही आणि प्रत्येक शाळेत विज कनेक्शन व काही शाळेचे विज बिल जे थकले असतील त्या संदर्भात देखील वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून तातडीने या संदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे.

जरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक संदीप पवार यांनी सांगितले की "दुर्गम डोंगराळ भागात आमच्या शाळेत लोकसहभागातून पायाभूत सुविधा उभ्या राहिल्या. मिशन जरेवाडी पॅटर्नमुळे शिक्षकांना प्रेरणा मिळाली आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वेग आला. शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे."


"मुलभूत शिक्षण सुधारण्याच्या उद्देशाने जरेवाडी पॅटर्न राबवला. संपूर्ण जिल्ह्यातही हा पॅटर्न सुरु आहे. पाटोदा तालुक्यात अल्पावधीतच गुणवत्तावाढीचे सकारात्मक निष्कर्ष मिळाले. हे यश ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याकडे नेणारे ठरेल."
**आमदार सुरेश धस**
**विधानसभा सदस्य, आष्टी/पाटोदा/शिरूर**

# रेवदंडा आगर आळीतील उदय मढवी कुटुंबाचा ७० वर्षांची गणेश-गौरी पूजन परंपरेचा वारसा कायम

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
घरगुती गणेशोत्सवही सार्वजनिकाइतकाच भव्य सात दशकांची अखंड परंपरा सांस्कृतिक वारशाचे द्योतक गणेशोत्सव हा फक्त धार्मिक सोहळा नाही, तर तो समाजातील एकोपा, संस्कृतीचे संवर्धन आणि जनजागृतीचे साधन आहे. रेवदंडा आगर आळीतील उदय कुंज येथे उदय मढवी कुटुंबाचा गणेशोत्सव याच भावनेचे जिवंत उदाहरण ठरला आहे. सन १९५६ साली स्वर्गीय जगन्नाथ बाळा मढवी यांनी मुंबई-वसई येथून आणलेल्या श्री गणेश आणि लाकडी गौरी स्थापून सुरू केलेली ही परंपरा आज सात दशकांचा टप्पा पार करूनही अखंड भक्तिभावाने सुरू आहे.नव्या घरात पहिल्यांदाच गणेश व गौराईंचे आगमन झाल्यापासून दरवर्षी पालखीतून श्रींची मिरवणूक, ताशा-ढोल वाजंत्रीसह गावकऱ्यांच्या उपस्थितीत काढली जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाइतकाच उत्साह या घरगुती उत्सवातही अनुभवायला मिळतो.गौरी आगमनाच्या निमित्ताने घरात संपन्नता, ऐश्वर्य व मंगलतेचा वास फुलतो, ही भावना मढवी कुटुंब पिढ्यान्पिढ्या जपत आले आहे. स्त्रीशक्तीचे पूजन हा या उत्सवाचा आत्मा असून तिच्या कृपेने घरात ऐक्य, समाधान आणि समृद्धी लाभते, असा विश्वास आहे. दरवर्षीप्रमाणे याही वेळी



गौरी मातेच्या समोर पारंपरिक गाणी, फुगड्या, नाच आणि जागरण होऊन उत्सवाची रात्र आनंदमयी झाली. विशेष म्हणजे, या उत्सवात हुबेहुब जिवंत देखावे सादर करण्याची परंपरा होती. संत ज्ञानेश्वर महाराज, संत एकनाथ महाराज यांची शिकवण, महाभारत रामायणातील धार्मिक प्रसंग, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडवणारे देखावे वर्षानुवर्षे सादर झाले. या देखाव्यांमधून समाजात एकोपा, नीतिमत्ता आणि देशभक्तीचा संदेश देत जनजागृतीचे कार्यही घडत असे. त्यामुळे गणेश-गौरी दर्शनाबरोबरच हे देखावे पाहण्यासाठी रेवदंडा पंचक्रोशीतील लहानथोरांची मोठी गर्दी होत असे."आपल्या पूर्वजांनी जपलेली संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा आहे.गौरी-गणपतीच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि आरोग्य नांदो," अशी भावना व्यक्त करत उदय जगन्नाथ मढवी यांनी परंपरेच्या सातत्याचा निर्धार व्यक्त केला.रेवदंडा पंचक्रोशीत या उत्सवाच्या सात दशकांच्या अखंड परंपरेची चर्चा रंगली असून, घरगुती गणेशोत्सवही सार्वजनिक उत्सवाइतकाच वैभवशाली आणि समाजप्रबोधनकारी ठरू शकतो, याचे प्रेरणादायी उदाहरण मढवी कुटुंबाने घालून दिले आहे.



पत्रकार पंकजकुमार पाटील यांच्या रायगड जिल्ह्यातील पेण येथील घरी विराजमान झालेली श्री गणेशाची सुबक मूर्ती.
(दैनिक युवक आधार )

# पिंपळस येथे बौद्ध व मातंग ऐक्य परिषद यशस्वी

## आपली चळवळ संपून फक्त वळवळ उरली आहे काय?" – अशा थेट प्रश्नाने पिंपळस येथे भरलेल्या बौद्ध व मातंग ऐक्य परिषदेची सुरुवात झाली.

**दैनिकः युवक आधार**
**/ प्रतिनिधी कृष्णा गायकवाड पिंपळगाव बसवंत**
पिंपळगाव बसवंत" बौद्ध परिषदेचे प्रवर्तक श्री योगेश भाऊ गांगुर्डे यांनी दिलेल्या माहिती नुसार पिंपळस येथे बौद्ध व मातंग 2 री एक्य परिषद यशस्वीपणे संपन्न झाली यावेळी... चळवळ संपून फक्त वळवळ उरली आहे काय?" – अशा थेट प्रश्नाने पिंपळस येथे भरलेल्या बौद्ध व मातंग ऐक्य परिषदेची सुरुवात झाली. बाबासाहेबांनी आणलेला समतेचा रथ आज एका चाकावरच फिरतो आहे, तर दुसरे चाक म्हणजे मातंग समाज व इतर शोषित जाती अजूनही अंधश्रद्धा व गुलामगिरीच्या बेड्यात अडकून बसल्या आहेत. या बेड्यातून बाहेर पडूनच समतेचा रथ पुढे नेता येईल, असा ठाम संदेश या परिषदेत देण्यात आला. परिषदेत "आम्ही दगड फेकला, देव नाही" या विचारातून समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोन पटवून देण्यात आला. "आपण सारे भाऊ आहोत, आपले दुःख-सुख एकच आहे, आणि




त्यातून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण" असे मार्मिक विचार नाटककार व साहित्यिक प्रा. रोहित पगारे यांनी मांडले. दुसरे प्रमुख वक्ते अशोक पालके (बीड) यांनी इतिहासाच्या संदर्भात ठामपणे सांगितले की, "मांग-महार हे वेगळे नसून एकच आहेत. रोटी व्यवहारासोबत आता बेटी व्यवहाराची गरज आहे." बीडमध्ये मातंग समाजाने परिषदेच्या ठरावातून आंबेडकर जयंती काढण्याची व आण्णाभाऊ साठे जयंतीत निळा झेंडा फडकवण्याची परंपरा रुजवली आहे, हे त्यांनी अभिमानाने सांगितले. मानव हक्क अभियानाचे नेते एकनाथ आव्हाड यांचा संदर्भ देत पालके म्हणाले की, "येशू युरोपातील मांग वाड्यात घराघरात पोहचला, पण शेजारीच असलेला बुद्ध, त्याची करुणा-अहिंसा-समता मांगवाड्यात का पोहचली नाही?, याचे आत्मपरीक्षण आंबेडकरी कार्यकर्त्यांनी केले पाहिजे." या परिषदेच्या माध्यमातून भविष्यात भव्य राज्यव्यापी परिषद घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषद प्रवर्तक अ‍ॅड. समाधान घोडेस्वार यांनी केले. धनंजय जाधव अध्यक्षस्थानी होते, तर सुरेश डांगळे यांनी स्वागताध्यक्ष म्हणून भूमिका निभावली. चंदन सुरळकर हे निमंत्रणाध्यक्ष होते.

# श्रीवर्धन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित पर्यावरण पूरक गणपती आरास स्पर्धेचे आयोजन

दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित
श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित पर्यावरण पूरक गणपती आरास स्पर्धेचे आयोजन केले होते, सध्याच्या काळात प्लास्टिक थर्माकोलचा वापर करून सजावट केली जाते, प्लास्टिक आणि थर्माकोल मुळे निसर्गाला हानी पोहोचत आहे याच गांभीर्य लक्षात घेऊन श्रीवर्धन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पर्यावरण पूरक गणपती आरास स्पर्धेचे आयोजनामार्फत जनजागृती करून एक चांगला संदेश समाजाला दिला आहे, या स्पर्धेला उत्स्फूर्त नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला , एकूण २९ स्पर्धकांनी या स्पर्धेसाठी आपली नावे आयोजकांकडे दिली होती आणि पर्यावरण पूरक देखावे आणि मखर तयार केले, गौरी पूजनाचे औचित्य साधून श्री.जितेंद्र सातनाक, श्री.बबन चाचले, श्री.दिनेश नागवेकर, श्री.सुनील पवार, श्री. भावेश मांजरेकर, श्री. निलेश सातनाक, श्री.अर्चित पोलेकर, श्री. निकेश भाटकर आदी मान्यवरांनी सर्वेक्षण करून विजेत्यांची नावे घोषित केली, प्रथम क्रमांक - अभय सातम (गणेश आळी), द्वितीय क्रमांक - देवकीनंदन रघुवीर (जीवना), तृतीय क्रमांक - अनंत गुरव (जीवनेश्वर आळी)
उत्तेजनार्थ - सिद्धेश नरवणकर(श्रीवर्धन दांडा)
उत्तेजनार्थ - मयुरेश कौलकर (नारायण पाखाडी )यांनी या स्पर्धेमध्ये पारितोषिके पटकावली आहेत







# मराठा आंदोलनाचा कुठेचं विरोध केला नाही व OBC आंदोलनाला पाठींबाही दिलेला नाही*राजे मुधोजी भोसले

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक विदर्भ विभाग**
मुंबईत आझाद मैदानावर मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच आंदोलन सुरू आहे. यात महाराष्ट्रातील लाखों मराठा सहभागी झाले आणि होत आहेत. या आंदोलनाच्या संदर्भात माध्यमानीं माझी भुमीका जानुन घेतली. त्यावर मी भुमीका जाहीर केली की, कोणाच्या अधिकारातून आरक्षण नको. "मराठा समाजाला शिक्षणासाठी व नोकरीसाठी मराठा म्हणून हक्काचं आरक्षण मिळावे. जेणेकरून ते टिकेल." मी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पाठींबा देऊन शुभेच्छाही दिल्या आहे.



परंतु माध्यमातील काही माध्यमानीं बातमी चालवली की मी जरांगेनां फटकारलं, मराठा आंदोलनाला विरोध केला, OBC आंदोलनाला मी पाठींबा दिला. हे अत्यंत चुकीच आहे. मी मराठा आंदोलनाचा कुठेचं विरोध केला नाही. व OBC आंदोलनाला पाठींबाही दिलेला नाही. या माध्यमातून माझी माध्यमानां विनंती आहे की, चुकीची बातमी चालवू नका. ह्या चुकीच्या बातमीमुळे मराठा समाजाच्या भावना दुखवल्या जात आहे. समाजात गैरसमज निर्माण होत आहे. मराठा समाजाच्या भावनाचा कृपया आदर करा. ह्या चुकीच्या बातम्यामुळे समाजांच्यां भावना दुखवल्या आसतील तर मी दिलगीरी ही व्यक्त करतो.
**राजे मुधोजी भोसले**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## भारज बुद्रुक येथे श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय भजनी मंडळ बाप्पांच्या उत्साहात मग्न



दैनिक युवक आधार
वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर निकाळजे जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात थाटा माठात सुखापुरी माता गणेश मंडळाच्या वतीने गणेश मूर्ती ची स्थापना करण्यात आली यावेळी श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय भजनी मंडळाच्या वतीने परंपरागत व आपल्या पिढीगत चालत असलेल्या प्रत्येक भजने गायन ही एक कला कायम राखून ठेवली पाहिजेत
यावेळी भजने गायन गणेश भक्ती गीते अशा अनेक प्रकारच्या मनाला भारहून टाकणाऱ्या भजने गायन गणेश भक्ती गीते च्या मोठ्या उत्स्फूर्त प्रतिसादात सादर करण्यात आले यावेळी पेटी वादक , रघुनाथ बोडखे , मृदुंगाचार्य, ब्रह्मा शिंदे, तबला वादक, राजू बेराड, गायनचार्य, प्रभाकर भुते, झांजवादक , विजय देशमुख, संबळ वादक , काशिनाथ दामधर, डफवादक, सुपडा ाडगे, एकतारी वादक, रामेश्वर दामधर, तुळशीराम पायघन, सांडू बेराड, गणेश कोथलकर, भगवान बोडखे,सुरेश तायडे,उत्तम फुसे,रमेश दामधर,आदी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्काराने पैलवान तानाजी चवरे (आप्पा) यांचा विशेष सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

२९ऑगस्ट २०२५ रोजी कोल्हापूर येथे मेजर ध्यानचंद क्रीडा रत्न पुरस्कार २०२५ यांच्यावतीने श्री पैलवान तानाजी चवरे (आप्पा) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. २५ वर्षे अखंड लाल मातीची सेवा आप्पा यांनी केली आहे. ग्रामीण भागात कुस्तीला पुनर्जीवन देण्याचे काम २५ वर्षे केले. कोरोना काळात सुद्धा यांचा मोठा हातभार लागला आहे. सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात यांचे योगदान आहे. . मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा 2025 यांच्यावतीने विशेष सन्मान करताना तानाजी चवरे( आप्पा ) बोलले "मला मिळालेला विशेष सन्मान महाराष्ट्र केसरी पैलवान संजय पाटील यांना अर्पित करतो. पैलवान संजय पाटील यांनी कुस्ती क्षेत्रात एक वेगळी निर्माण केली. आजही कुस्ती क्षेत्रात पैलवान संजय पाटील यांचे महाराष्ट्र भर नाव काढले जाते." भारतामध्ये दरवर्षी २९ ऑगस्टला मेजर ध्यानचंद यांचा वाढदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो ध्यानचंद यांना इतिहासातील सर्वोत्तम हॉकी खेळाडू




पैकी एक मानले जाते. त्यांना हॉकीचा जादूगार असे सुद्धा नावाने ओळखले जाते. त्यांनी १९२८ ,१९३२ आणि १९३६ मध्ये भारताला ऑलिम्पिक मध्ये तीन सुवर्णपदके जिंकून दिली. त्यांच्या चेंडूवरील नियंत्रणासाठी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी ते जगभरात प्रसिद्ध आहेत

**या कर्यक्रमासाठी**
मा प्रा डॉ लक्ष्मणरावजी ढोबळे सर
माजी मंत्री महाराष्ट्र राज्य.,(जीवन गौरव पुरस्कार )
हिंद केसरी दीनानाथ सिंह अण्णा,मा सुरेंद्र कालिरमण सर (दिल्ली )
आध्यक्ष भारत गौरव पुरस्कार समिती.
मा धनंजय पाटील काका अटकेकर सरचिटणीस जिल्हा कुस्तीगीर संघ सातारा
शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त
उपमहाराष्ट्र केसरी
पै रवींद्र पाटील बाणगेकर ( महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्कार )
शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त
हॉकी इंडिया स्टार प्लेर
अक्षता ढेकळे पाटील
आणि प्रा पै अमोल साठे स्वागतध्यक्ष मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्कार समिती
यांच्या उपस्थिती मध्ये हा पुरस्कार सोहळा पार पडला. निवड समिती प्रमुख प्रा नितीन शिंदे सर, निवड समिती सदस्य मा सुहास कारेकर सर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. नीटनेटक सूत्रसंचालन निंबाळकर मॅडम यांनी केलं तर आभार प्रदर्शन दिगंबर सुतार सर यांनी केले

## श्रीवर्धन मध्ये गौरी मातेच आगमन आणि पूजन उत्साहात साजरा

















दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित
भाद्रपद महिन्यात गौरीपूजन किंवा महालक्ष्मी पूजन हिंदू संस्कृतीत महिलांचा एक महत्त्वाचा व्रत मानला जातो,गौरी पूजन हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा सण आहे त्याला महालक्ष्मी पूजा देखील म्हटले जाते, भाद्रपद महिन्यात अनुराधा तिच्या सद्गुण स्वभावाप्रमाणे नक्षत्रात महालक्ष्मी / गौरीची चित्रे किंवा मूर्ती ठेवली जातात या नक्षत्रात महालक्ष्मीची पूजा करुन महानैवेद्य दाखवले जातात तिसऱ्या दिवशी ते मूल नक्षत्रात महालक्ष्मी गौरीचे विसर्जन करण्यात येते, या गौरीला महालक्ष्मी हि म्हटले जाते आणि ज्येष्ठ नक्षत्र म्हणून पूजले जाते म्हणून तिला ज्येष्ठा गौरी असे हि संबोधले जाते, हिंदू धर्मशास्त्रा गौरीला शिवशक्ती आणि गणपती बाप्पांची माता मानले जाते द्वादशगौरीचा उल्लेख अपराजितप्राचीन पुस्तकात करण्यात आला आहे, गौरीच्या मूर्तीची एकत्रित येऊन पूजा केली जाते, गणपतीचा सण कुलचराच्या रूपात सर्व जाती व जमाती संपूर्णपणे साजरा करतात. ज्या घरांमध्ये शेती हा मुख्य व्यवसाय आहे तेथे महिला धान्य देऊन उपासना करतात लक्ष्मी किंवा गौरीच्या मांडणीत विविधता असली तरी जमीन समृद्ध करण्यासाठी धान्य लक्ष्मीची पूजा करणे हा मूळ हेतू असतो, गौरीच्या पूजेची पद्धत आणि परंपरा जागोजागी वेगवेगळी असलेली आपल्याला पहायला मिळते काही कुटुंबांमध्ये गौरी मातेचा मुखवटा आहे तर काही पारंपारिकपणे जलाशयात जातात आणि पाच, सात किंवा अकरा दगड घेऊन येऊन त्यांची पूजा करतात तर काही ठिकाणी विशिष्ट झाडाची घरी आणून पूजा केली जाते, अनेक घरात अनेक प्रकारात गौरी / महालक्ष्मी येतात. आगमनाच्या दिवशी संध्याकाळी किंवा पंचांगात शुभ काळ मानला जातो, त्याच रात्री गौरीचे संगोपन होते परंपरेनुसार जेव्हा तिला घराच्या दारातून आणले जाते तेव्हा तिच्या हातात किंवा डोक्यावर गौरी असलेल्या महिलेचे पाय दूध आणि पाण्याने धुतले जातात आणि तिच्यावर कुमकुम स्वस्तिक ओढले जाते. घराच्या दारापासून गौरीची स्थापना करायच्या ठिकाणी ते गौरीचे मुखवटे लक्ष्मीच्या पायाचे ठसे घेतात. त्यावेळी डिश चमच्याने किंवा घंटानाद केला जातो यामुळे नकारात्मक ऊर्जा नाहीशी होते नंतर आशिर्वाद देऊन ऐश्वर्या नंदोसाठी प्रार्थना केली जाते, गौरीला पूजेच्या दिवशी खीर आणि गोड वडे याचा नैवेद्य अर्पण केला जातो, श्रीवर्धन मध्ये हा गौरी गणपतीचा सण पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, सर्वजण गौरी / महालक्ष्मी मातेची मनोभावे पूजा करून मागण मागत असतात अशाच गौरी मातेची काही मनमोहक रूपे

## गणपती बाप्पाचे वाजत-गाजत स्वागत

दैनिक युवक आधार
प्रविण तांबोळकर
येरोळ : येणार.. येणार.. म्हणून भक्तगण ज्याची आतुरतेने वाट बघत होते, त्या लाडक्या बाप्पाची बुधवारी प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

'गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया' 'आले रे आले गणराय आले' च्या जयघोषात बाप्पाची मूर्ती वाजत-गाजत घरी नेताना दिसून आले. शिरूरआनंतपाळ तालुक्यात व शहरात गणेशाची प्राणप्रतिष्ठापनाच्या पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी झाली होती. शहरात पुढील अकरा दिवस उत्साह आणि चैतन्याचे वातावरण असणार आहे.

येरोळ येथील श्रीराम गणेश मंडळाने दररोज सांयकाळी समाज प्रबोधन करण्यासाठी नामवंत किर्तनकाराची किर्तन ठेवली आहेत.



## सुरगाणा महाविद्यालयात पर्यटन विकास महामंडळा अंतर्गत आदिवासी संस्कृती सादरीकरण

दैनिक युवक आधार
राजेंद्र टोपले, सुरगाणा

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. सी.जी.दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल व आय क्यू एसी विभागामार्फत महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळा अंतर्गत महाराष्ट्रातील नाशिक व पालघर जिल्ह्यात सांस्कृतिक वारसावर सांस्कृतिक पर्यटनाचा विकास या विषयावर कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे श्री.सुमनदास, श्री.जामिल अख्तर,श्रीमती अभिबशा घोष, श्रीमती सुनयना दास, गुप्ता,श्री.अधिरम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. सुमनदास यांनी सांगितले की सामाजिक ज्ञान अवगत करण्यासाठी पर्यटन स्थळांना भेटी देणे तसेच आदिवासी भागातील जुन्या संस्कृतीचे संवर्धनाबरोबरच जतन करणे महत्त्वाचे आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे दुसरे वक्ते श्रीमती अभिबशा घोष यांनी ऑनलाईन पी. पी. टी. स्लाईड्सवर विद्यार्थ्यांना पर्यटन क्षेत्र नैसर्गिक,ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा गडकिल्ले,लेणी,समुद्र,धबधबा तसेच




आदिवासी भागातील जुनी संस्कृती पावरी, ढोल, थाळी,सांबळ,तारपा,डेरा,नगारा ही नृत्ये आदिम संस्कृतीची छायाचित्रे दाखवत सादरीकरण केले. तसेच आंतरराष्ट्रीय किर्तीचे आदिवासी वारली चित्रकार पद्मश्री जिव्या म्हसे, संगित नाटक अकादमी पुरस्कार विजेते तारपा वादक ढिकल्या धींडा यांची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, युनोने महाराष्ट्रातील बारा गड किल्ल्यांना जागतिक किर्तीचा दर्जा दिला आहे.अजून पर्यटन स्थळ विकास झाला पाहिजे तसेच आदिवासी भागातील संस्कृती जतन संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.अनिल गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. सुरेश भोये यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील आय क्यू एसी समन्वयक डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा.कविता भोये,प्रा.बी.डी.धुम उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

## शिरूरआनंतपाळ तालुक्यात अतीवृष्टीमुळे १९ हजार ४८ हेक्टरवरील पिकांना फटका !

### शेतकऱ्यांना सरसगट नुकसान भरपाई देण्याची मागणी

दैनिक युवक आधार
प्रविण तांबोळकर
येरोळ : दिं. २७ आगष्ट पासुन पडलेल्या मुसळधार पावसामुळे घरणी व मांजरा नदी लगतच्या व तालुक्यातील सर्वच गावातील ढगफुटीदृष्य पडलेल्या पावसामुळे १९ हजार ४८ हेक्टरवरिल खरिप हंगामातील पिकाचे नुकसान झाले असुन जवळपास सुमारे २५ हजार हेक्टरवरिल शेतकरी बाधीत झाले असल्याचा प्राथमीक अंदाज असुन यामध्ये सोयाबीन तुर व ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. या सर्वांना शासनाने सरसगट पंचनामा करुन तत्वरीत भरपाई द्यावी अशी मागणी शिवसेना ऊबाठा गटाचे तालुका अध्यक्ष भागवत वंगे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसिलदार लालासाहेब कांबळे यांच्या मार्फत मा.मूख्यमंत्री यांना देण्यात आले आहे.

शिरूरआनंतपाळ तालुक्यात यंदा २५ हजार ५७७ हेक्टरवर पेरणी करण्यात आली असुन त्यामध्ये सोयाबीन २१ हजार ८३१ हेक्टरवर तर तुर ३ हजार ४८ हेक्टर वर पेरणी करण्यात अली होती. तसेच शिरूरआनंतपाळ तालुक्यात साकोळ व घरणी येथील मध्यम प्रकल्प व पांढरवाडी येथील लघु प्रकल्पाच्या पाण्यावर २ हजार ८११ हेक्टरवर ऊसाचे क्षेत्रावर ऊसाची कागदपत्री नोंद असली तरी सुमारे पाच हजारपेक्षा जास्त ऊसाचे क्षेत्र आहे. गूरुवारी पडलेल्या ढगफुटीदृष्य पावसामुळे साकोळ मंडळात ११३ / ३० शिरूरआनंतपाळ ११५ / ३० तर हिसामाबाद मंडळात ७९ मिलिमिटर पावसाची नोंद झाली आहे. तालुक्यात ३०७




/ ६० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. या मोठ्या पडलेल्या पावसामुळे मांजरा व घरणी नदीकाठचा परिसर व तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये मुसळधार पडलेल्या पावसामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अतीवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची दखल घेऊन शासनाने सरसगट पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ऊबाठा गटाचे तालूका प्रमुख भागवत वंगे, शहर प्रमुख सतिष शिवणे महिला आघाडी प्रमुख सरोजाताई गायकवाड, गोविंद श्रीमंगल, शिध्दांत गायकवाड, दयानंद किने, व्यंकट कल्ले, सुमठाणा येथील विष्णु बिरादार, रविनाथ महाराज तांबोळकर यांच्यासह तालुक्यातील शिवसैनिक उपस्थित होते.ञ्

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रात भावपूर्ण वातावरणात नियोजन बध्दरित्या पाच दिवसाच्या गणपतींना निरोप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे 4 हजार 658 पेक्षा अधिक पाच दिवसाच्या घरगुती गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा 6.0 अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभाग या 8 विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी



करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटना देखील महापालिकेस सहकार्य करत आहेत.

यावर्षी महापालिकेच्यावतीने एकुण 134 ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये 58 ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून 76 ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर,निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

दरम्यान विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार सर्व उपायुक्त व सहाय्यक आयुक्त ,प्रभाग अधिकारी व कर्मचारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण केले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलिस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती प्राथमिक उपचारार्थ सेवा देण्यात येत आहे.

पालिका क्षेत्रातील गणेश मंडळाच्या दारात जाऊन दररोज निर्माल्य गोळा करण्यासाठी महापालिकेने विशेष 'निर्माल्य संकलन रथ' तयार केले आहेत. या निर्माल्य संकलन रथाच्या माध्यमातून दररोज निर्माल्य संकलन केले जात आहे. या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यात येणार आहे. याचबरोबर विसर्जन काळात विसर्जन घाटावरील स्वच्छतेसाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

# रायगडच्या पॉवरलिफ्टिंग खेळाडूंचा जिल्हा क्रीडाधिकाऱ्यांकडून गौरव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

*अलिबाग रायगड येथे 29 ऑगस्ट 2025 रोजी मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून* *साजरा करण्यात आला*.

याप्रसंगी विविध खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय पातळीवर यांनी उल्लेखनीय कामगिरी केले अशा खेळाडूंचा गौरव खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ साहेब उपस्थित होते. तसेच जिल्हा क्रीडा संयोजक रमेश म्हात्रे, तालुका अध्यक्ष रोशन भगत, भाजप युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी श्रीमती तपस्वी गोंधळी , क्रीडा अधिकारी कार्यालयाचे मान्यवर अधिकारी आणि क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी पावर लिफ्टिंग च्या खालील खेळाडूंचा गौरव करण्यात आला. गायत्री बडेकर व अमृता भगत(आंतरराष्ट्रीय किताब आणि राष्ट्रीय पदक विजेते) महेश पाटील, कुणाल पिंगळे (आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पदक विजेते) बबन झोरे, विनायक पाटील, गणेश तोटे (राष्ट्रीय पदक विजेते) या पदक विजेत्या खेळाडूंच्या सत्काराबाबत पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड चे अध्यक्ष गिरीश शरद वेदक , कार्याध्यक्ष





यशोदा अंबाजी मोकल, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य संदीप पाटकर, सुभाष टेंबे, खजिनदार राहुल गजरमल आणि ज्येष्ठ खेळाडू माधव गोविंद पंडित यांनी आनंद व्यक्त करण्यात आला असून क्रीडा अधिकारी यांचे जाहीर आभार मानले आहेत.

## तिर्रट खेळणाऱ्या १५ जणांवर गुन्हा दाखल ५ लाख ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त, अंभोरा पोलीसांची कारवाई

**दैनिक युवक आधर**
**आष्टी प्रतिनिधी**

अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील
अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर तसेच मा. उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे वेळोवेळी मोहिम राबवत धाड टाकून अवैध धंदे विरुद्ध कडक कारवाई करत आहेत. कोल्हेवाडी येथील पत्र्याच्या शेडमधील तिर्रट जुगार अड्ड्यावर छापा टाकून १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करुन ५ लाख ६४ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मा. पोलिस अधीक्षक नवनीत सर, मा. अप्पर पोलिस अधीक्षक सचिन सर तसेच मा. उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण सर यांच्यामार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कोल्हेवाडी येथील पत्र्याच्या शेडमधील जुगार अड्ड्यावर निम्म्या रात्री सापळा रचून धाड टाकली. या कारवाईदरम्यान १५ जुगारींवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ५ लाख ६४ हजार १५० रुपये किमतीचा मुद्देमाल (रोख रक्कम, दुचाकी, मोबाईल, पत्ते इत्यादी साहित्य) जप्त करण्यात आले 2 आहे. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये अंभोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउनि आदिनाथ भडके करीत आहे. सदरची कारवाई अंभोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि मंगेश साळवे, ग्रेड पोउनि देविदास, पोह अतुल, पोह बाबुराव, पोशिं तुषार यांनी केली आहे.

# इंद्रराज महाविद्यालयात तीन दिवसीय क्रीडा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड-** इंद्रराज महाविद्यालय सिल्लोड येथील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे मेजर ध्यानचंद यांच्या जन्म जयंती निमित्त दिनांक 29 ते 31 ऑगस्ट 2025 या तीन दिवसात क्रीडा कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यासाठी संस्थेचे सचिव माननीय श्री अशोकजी देवरे साहेब अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यात प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा विभागाचे प्राध्यापक डॉ. माधवसिंग इंगळे हे उपस्थित होते तर विशेष उपस्थितीमध्ये प्रा. प्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब सर उपस्थित होते.

सर्वप्रथम मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक डॉ. माधवसिंग इंगळे यांचा रोप देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्वयंशिस्त हा यशाचा पाया आहे असे सचिवांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर प्र. प्राचार्य लांब सर यांनी खेळ व तंदुरुस्ती यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाची क्रीडा प्रशिक्षक व प्रमुख पाहुणे डॉ. माधवसिंग इंगळे सरांनी विद्यार्थ्यांना क्रीडा प्रकाराबद्दल व त्यातली यशाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. कृष्णा नगरे सर यांनी खेळ व खेळाडू वृत्ती कशी महत्त्वाची यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे नियोजनात द्वितीय 30 तारखेला व तृतीय दिवशी 31तारखेला अनुक्रमे वाद विवाद स्पर्धा व सायकल रॅलीचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लांब सर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कृष्णा नगरे, प्रा. प्रीतम मुळे, डॉ. आर. एम. बिरादार मॅडम, डॉ. विनोद शेळके, डॉ.जे. जे. पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री उत्तम शिंदे पवार यांनी शुभेच्छा दिल्या.




# एम-प्लस ऊर्जा प्रकल्पाचा अन्याय...!

## करार न पाळल्याने शेतकरी कुटुंबासह आत्मदहनाच्या तयारीत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

राळेगाव :-राळेगाव व कळंब तालुक्याच्या सीमेवर एम-प्लस सोलर ऊर्जा प्रकल्प तब्बल ७०० एकरांवर उभारण्यात आला असून,शेकडो शेतकऱ्यांकडून सुपीक जमीन भाडे तत्वावर बळकावली गेली आहे.या प्रक्रियेत अनेक शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. अशीच घटना उमरी येथील शेतकरी दिवाकर वनारसे (वय ५०) यांच्या बाबतीत घडली आहे.वनारसे यांच्या ६ एकर शेतीपैकी ३ एकर शेतजमीन एम-प्लस कंपनीकडून कराराद्वारे घेण्यात आली. त्या बदल्यात वर्षाला दीड लाख रुपये भाडे देण्याचे ठरले. मात्र उर्वरित ३ एकर शेतीचा करार करण्यासाठी कंपनीचे अधिकारी रुपेश लुथरा यांनी दबाव आणला. सुरुवातीला ३० वर्षांचा करार करून ४० लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले, पण नंतर शब्द फिरवत फक्त २० लाख रुपये देऊन उर्वरित २० लाख नंतर देऊ असे सांगण्यात आले.लुथरा यांच्या बोलण्यावर विश्वास नसल्याने वनारसे यांनी करार करण्यास नकार दिला. कारण यापूर्वीही अशाच पद्धतीने इतर शेतकऱ्यांची अशिक्षितपणाचा फायदा घेत फसवणूक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. करार न झालेल्या सर्वे नंबर १८३ मधील शेतात कंपनीने काम सुरू केले असून दोन हंगाम पूर्ण होऊनही वनारसे यांना एकही रुपया मोबदला मिळालेला नाही. परिणामी ते आर्थिक संकटात सापडले आहेत.

"जगण्याचे साधन असलेली सुपीक ओलिताची



जमीनच बळकावली गेली, मोबदला मिळाला नाही,जमीन परत मिळाली नाही,त्यामुळे आता सहनशक्ती संपली आहे,"असे म्हणत वनारसे यांनी अखेर ३ सप्टेंबर रोजी एम प्लस ऊर्जा कंपनीच्या उमरी येथील ऑफिससमोर सहकुटुंब आत्मदहन करण्याचा निर्णय घेतल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यवतमाळ, पोलिस अधीक्षक, तहसीलदार कळंब,पोलिस निरीक्षक कळंब तसेच मतदारसंघाचे आमदार व आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांना दिले आहे.वनारसे यांना भीती आहे की, "करारावर सही न केल्यास मला मारून टाकले जाईल," असेही त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,२ सप्टेंबरपर्यंत करार न केल्यास ३ सप्टेंबर रोजी सहकुटुंब आत्मदहन करावे लागेल. यामुळे एम-प्लस ऊर्जा प्रकल्पाच्या अन्यायकारी धोरणाविरोधात शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. आगामी काळात या प्रकल्पाविरोधात शेतकरी रस्त्यावर उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# ग्राहक पंचायतच्या अध्यक्षानी गौरी आवाहनासाठी ग्राहक प्रबोधन देखावा सादर

सिल्लोड येथे इन्फिनिटी पोदार लर्न स्कूल व जिनियस चेस अकादमीतर्फे जिल्हास्तरीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धा संपन्न

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर
सिल्लोड :- येथे इन्फिनिटी पोदार लर्न स्कूल व
जिनियस चेस अकादमीतर्फे
जिल्हास्तरीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेमध्ये एकूण 200+ अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये जालना, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जळगाव,गंगापूर या भागातून स्पर्धक सहभागी झाले होते.

ही स्पर्धा 14,11,9, व खुला गट अशा



चार गटात घेण्यात आली. व चार गटात खेळविण्यात आली प्रत्येक गटातील पहिल्या दहा विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक 7000 रुपये

तसेच उर्वरित सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

9 वर्षांखालील गट :

१. श्रेया शेळके, २. अर्णव सोमवंशी, ३. पियुष माने. ४. सर्वेश वारे, ५. मोनीश भन्साली.

11वर्षांखालील गट

१. श्रेयस नलावडे २. तन्मय सिंगने ३. विराट पाकल ४. शौर्य तिडके ५. अन्वेष देशमुख.

१४ वर्षांखालील गट

वर्षांखालील गट : १. कौस्तुभ वाघ, २. श्लोक काळे, ३. सक्षम चव्हाण, ४. ईशान पाठक , ५. सार्थक गिरणारे.

खुला वयोगट : १. सारंग कुलकर्णी, २. रेखा वाघ, ३. निखिल चरावंडे, ४. बादल बैनाडे ,
५. प्रथमेश पंडित.

सर्वोत्तम लहान खेळाडू :
आरुष फरकाडे.
आरुष लोखंडे.

विविध गटातील विजेत्यांना प्रमुख पाहुणे आदित्य मंजुनाथ, मंगेश गिरनारे, गिरीश सोळुंके,राज रोहरा,सागर भाग्यवंत , बळीराम सोमवंशी, गणेश परदेशी, बाळू तिडके, मयुरेश समिंद्रे, वृषाली गिरनारे मिताली मंजुनाथ, यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आयोजक आणि मुख्य प्रशिक्षक मयुरेश समिंद्रे यांनी पुढाकार घेतला.

# बाप्पाच्या आगमनाने एकजुटीचा संदेशः मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचा अनोखा गणेशोत्सव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हणजे फक्त बाप्पाची मूर्ती आणि मोदक नव्हे, तर तो आहे एकोपा आणि आनंद साजरा करण्याचा उत्सव. पनवेलमध्ये मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या कार्यालयात दीड दिवसांच्या बाप्पाच्या आगमनाने हाच संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला. राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांच्या पुढाकाराने गेले सहा वर्षे हा उत्सव साजरा केला जात आहे. विशेष म्हणजे, मुस्लिम समाजाचे असूनही डॉ. तांबोळींनी सर्वधर्म समभावाच्या शिकवणीला प्रत्यक्षात आणले आहे.

या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सिनेअभिनेता सिद्धार्थ जाधव यांचे बंधू डॉ. लव्हेश जाधव यांची उपस्थिती. यानिमित्ताने महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. लव्हेश जाधव यांनी महिलांना आरोग्याची काळजी घेण्याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले, जेणेकरून हा धार्मिक सोहळा सामाजिक कार्याशी जोडला गेला.



यावेळी, फेडरेशनच्या कार्यालयात सर्व धर्मांचे लोक एकत्र आले. त्यांनी बाप्पाची आरती केली, भजन गायले आणि एकदिलाने हा उत्सव साजरा केला. सुरज नागे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भक्तिभावाने दीड दिवस हा सोहळा पार पाडला. पनवेल शहर अध्यक्ष आशिष मोहोकर, नेहा किरनळी आणि राज सदावर्ते यांच्यासह इतर सदस्यांनी मिळून सुंदर रूप दिले होते. रत्नप्रभा गोमासे यांनी अर्पण केलेला शिरा प्रसाद म्हणून सर्वांना वाटण्यात आला.

फेडरेशनच्या या प्रयत्नांचे सर्वांनी कौतुक केले. मानवता हाच खरा धर्म मानणाऱ्या या संस्थेने गणेशोत्सवासारख्या सणांना धार्मिकतेच्या पलीकडे जाऊन एक सामाजिक चळवळ बनवले आहे. यानिमित्ताने केवळ बाप्पाचे आगमन झाले नाही, तर सर्व समाजाला एकत्र आणणाऱ्या एका विचाराचे आगमन झाले, असे म्हणणे योग्य ठरेल.अनेकांनी गाणी गात कार्यक्रमाला चार चांद लावले.

यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष देवा पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर, राष्ट्रीय सचिव गुरदीप सिंग, महाराष्ट्र उपाध्यक्ष दिनेश महाडिक, रायगड जिल्हा अध्यक्ष विजय खेडकर, महाराष्ट्र सचिव निलेश भगत, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रगती पोटे, भारत भोपी, गुरुनाथ म्हात्रे, सेवा निवृत्त विंग कमांडर राजेंद्र महानुभाव, विद्या सावंत, शमीम पठाण,राष्ट्रवादी महिला सरचिटणीस रत्नमाला पाबरेकर

,समाजसेवक योगेश पगडे,उद्योजक जितेंद्र खैरे,समाजसेवक मंगल भारवड, समाजसेवक सचिन पाटील यांनी भक्तिभावाने दर्शन घेतले

# ग्राहक पंचायतच्या अध्यक्षानी गौरी आवाहनासाठी ग्राहक प्रबोधन देखावा सादर

दैनिक युवक आधार
सणसरः- विकास क्षत्रिय

इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी गावातील माजी ग्रामपंचायत सदस्य व इंदापूर तालुका ग्राहक पंचायत समितीचे अध्यक्ष यांनी घरी गौराईच आगमन झाले यामध्ये ग्राहक प्रबोधन देखावा केला.सध्या कोणत्याही ग्राहकाला फसवणुक झाली तर तक्रारी कुठे करायच्या हे माहीत नसत हिच ग्राहकाची समस्या ओळखुन आधार आयकर, आरोग्यविमा,शेतकरी कॉल कृषी गॅस जागो ग्राहक, जिवनदायी आरोग्य योजना नरेगा पणन विभाग बार्टी मतदार नोंदणी रेल्वे तक्रार सामाजिक न्याय, स्त्रीभुन हत्या स्वस्त धान्य दुकान स्वाईन फ्युय,चाईल्ड महिला तक्रार तंबाखु मोबाईल तक्रार लाचलुचपत विभाग वन विभागअश्या विविध २८ प्रकारच्या तक्रारीचे माहिती देण्यात आली आहे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक यांची जर फसवणुक




झाली असेल तर आम्ही नागरिकांना मोफत मार्गदर्शन करून न्याय मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाईल असं आव्हान या देखाव्यातून करण्यात आली असून कोणतेही वस्तू व सेवा खरेदी करत असताना खालील गोष्टी नक्की तपासा छापील किंमत वैधता वजन माप गॅरंटी व वॉरंटी ग्राहक हक्कांमध्ये समविष्ट हक्क तक्रार निवारण हक्क निवड करण्याचा हक्क, सुरक्षीता हक्क ग्राहक जागृतीचा हक्क वस्तु अथवा सेवा यासंबंधी माहिती घेण्याचा हक्क बाजु ऐकुण घेण्याचा हक्क अश्या सर्व तक्रारी साठी आम्ही आपणास मोफत मार्गदर्शन करू हे सर्व गौरी गणपतीच औचीत्य साधुन ग्राहक प्रबोधन करण्याची सेवा मिळाली.